# पिर्लात सरकारी शाळेत वनमहोत्सव

**मडगाव : प्रतिनिधी**

सुलकर्णा येथील डॉन बॉस्को कृषी महाविद्यालयाच्या 'ग्रामीण कृषी कार्यानुभव' उपक्रमाअंतर्गत प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी केपे पिर्ला, येथील सरकारी प्राथमिक विद्यालय आणि अंगणवाडी यांच्या संयुक्त विद्यमाने पिर्ला सरकारी शाळेच्या आवारात विविध रोपटी लावून वनमहोत्सव साजरा केला.

पिर्ला सरकारी प्राथमिक विद्यालयाचे शिक्षक, अंगणवाडीच्या शिक्षिका, विद्यार्थी, पालकवर्ग उपस्थित होते.

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना वनमहोत्सवाची माहिती सांगितली. आपण रोपटी का लावावीत, त्यांचे संगोपन कसे करावे, त्यांचा आपणाला कसा उपयोग होऊ शकतो याची सविस्तर माहिती शिक्षकांनी विद्यार्थ्यांना दिली.



**पिर्ला : वनमहोत्सवात सहभागी झालेले सरकारी शाळेचे विद्यार्थी. सोबत शिक्षक व कृषी महाविद्यालयाचे विद्यार्थी.**

शाळेतील विद्यार्थी तसेच कृषी महाविद्यालयातून प्रशिक्षणासाठी आलेल्या कृषिदूतांनी विद्यालय परिसरात विविध प्रकारच्या झाडांची रोपटी लावली. विद्यार्थ्यांनी स्वतः घराकडून झाडांची रोपटी आणली होती.

वनमहोत्सवानिमित्त शालेय विद्यार्थ्यांसाठी 'पर्यावरण' या विषयावर चित्रकला स्पर्धा घेण्यात आली. विद्यार्थ्यांनी आपल्या मतानुसार वेगवेगळ्या प्रकारची चित्रे काढली होती. चित्रकला स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षिसे प्रदान करण्यात आली.